


दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३४७ वा सोमवार दि १८ मे २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# महाराष्ट्रात पुन्हा निवडणुकांचे पडघम; विधानपरिषदेच्या १६ जागांसाठी निवडणूक तारखांची घोषणा, मतदारसंघांची संपूर्ण यादी

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

मुंबई: महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकांची घोषणा करण्यात आली असून १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या सर्व १६ जागा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातील असून या जागांसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत २५ मे ते १ जून असणार आहे, तर अर्जांची छाननी २ जून रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्याने या मतदारांतून होणाऱ्या विधानपरिषदेच्या निवडणुकाही लांबल्या होत्या. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही दिवसांपूर्वी पार पडल्याने विधानपरिषदेच्या या १६ जागांसाठीच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना काही दिवसांपूर्वीच विधानसभा सदस्यांच्या मतदानावर होणाऱ्या विधानपरिषदेच्या ९ जागांवरील निवडणूक पार पडली. विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवड झालेले नऊ आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या



एक अशा दहा सदस्यांचा शपथविधी गुरुवारी सकाळी विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात पार पडला. परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या सदस्यांना शपथ दिली. या वेळी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार उपस्थित होते. बिनविरोध निवड झालेल्या सदस्यांमध्ये भाजपचे प्रमोद जठार, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, संजय भेंडे. शिवसेनेच्या नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, शिवसेना उबाठा पक्षाचे अंबादास दानवे आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून झिशान सिद्दीकींचा समावेश आहे. प्रज्ञा सातव यांनी काँग्रेस पक्षातून राजीनामा दिल्यानंतर रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक घेतली होती. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर सातव यांनाच ती जागा देण्यात आली.

# आमदार फोडला, मंत्रीपद दिलं तर विजय सरकार सहा महिन्यात कोसळेल, मोदी समर्थक नेत्याचा ला इशारा

वृत्तसंस्था/ लखनऊ

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठानं एक महत्त्वाचा आदेश दिला आहे. रायबरेलीतील पोलीस ठाण्यात राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. हे प्रकरण राहुल गांधी यांच्या ब्रिटिश नागरिकत्वाशी संबंधित आहे. भाजप नेते विग्नेश शिशिर यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठात एक याचिका दाखल केली होती. राहुल गांधी यांच्याकडे ब्रिटनचं नागरिकत्व असल्याचा आरोप त्यांनी केला होता. राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी शिशिर यांच्याकडून करण्यात आली होती. त्यावर न्यायालयात सुनावणी झाली. राहुल गांधी यांच्याकडे दुहेरी नागरिकत्व असल्याचा आरोप आहे. म्हणजेच ते एकीकडे भारताचे नागरिक आहेत. सोबतच ते ब्रिटनचेही नागरिक आहेत. भारतीय कायद्यानुसार एका व्यक्तीकडे केवळ एकाच देशाचं नागरिकत्व असायला हवं. एखाद्या व्यक्तीकडे दुहेरी नागरिकत्व असल्यास तो भारतात निवडणूक लढवू शकत नाही आणि खासदारही होऊ शकत नाही. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी रायबरेलीमधून विजयी होऊन खासदार झाले. यानंतर विग्नेश शिशिर यांनी न्यायालयात याचिका दाखल केली. राहुल गांधी यांच्याकडे ब्रिटनचं नागरिकत्व असल्यास त्यांची खासदारकीच बेकायदेशीर ठरते, असा दावा त्यांनी याचिकेतून केला न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांच्या खंडपीठानं याचिकेवर सुनावणी घेतली. या प्रकरणात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले. राहुल गांधी यांच्या विरोधात रायबरेली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. या प्रकरणाची



सीबीआय चौकशी व्हावी, अशी मागणी उत्तर प्रदेश सरकारनं केली होती. ही मागणी न्यायालयानं मान्य केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांनी या प्रकरणाशी संबंधित टॉप सीक्रेट फाईल न्यायालयाला देण्याची परवानगी दिली. त्यामुळेच न्यायालयानं हा निकाल दिल्याचं भाजप नेते शिशिर म्हणाले.

# मोडणाऱ्या चौकटी.... रुळणारे रस्ते



चित्र : रोहन पोरे

कुटुंब म्हणजे नक्की काय, हे शोधत इतिहासात मागे गेलो तर रक्तसंबंध असलेला गट अथवा एका भिन्नलिंगी जोडप्यापासून पुढे शाखा-उपशाखा फुटत गेलेला गट अशी रचना दिसते. आफ्रिका, अफगाणिस्तान येथील मागास भागांत अजूनही शिल्लक असलेले टोळीसमूह किंवा आपल्याकडच्या कुल, गोत्र इत्यादी संकल्पना याला पुष्टी देतात. संस्कृतीच्या प्रवासात आगीच्या व चाकाच्या शोधामुळे मानवासाठी वस्तुनिर्मिती सोपी झाली, तर शेतीच्या शोधामुळे गरजेपेक्षा जास्त अन्नाचे उत्पादन होऊ लागले. यातून संपत्ती तयार झाली आणि संपत्तीच्या संचयाला वारस हवा म्हणून लग्नसंस्थेचा व पर्यायाने कुटुंबसंस्थेचा जन्म झाला. भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास म या वि.का. राजवाडे यांच्या पुस्तकात उल्लेख येतो की, पुरातन काळात सहोदर भाऊ-बहीण यांचे विवाह मान्य होते, शिवाय मामा-भाची, काका-पुतणी असेही विवाह होत असत. पाश्चात्त्य विचारवंत एमिल डर्खिम म्हणतो - ङ्गसामाजिक परिस्थितीनुरूप वावरायला/ व्यवहाराला सोपे जावे अशीच सर्व सामाजिक संस्थांची रचना असते; कुटुंबसंस्था ही त्यापैकी एक आहे (स्ट्रक्चरल फक्शनॅलिझम). मार्क्सवादानुसार माणसाचे सर्व व्यवहार आर्थिक देवघेवीशी निगडीत असल्यामुळे कुटुंब हे आर्थिक व्यवहाराचे एक ङ्गयुनिटफ म्हणता येईल. प्रत्येक कुटुंबाचे आर्थिक व्यवहार स्वतंत्र असतात आणि तुम्ही ज्या कुटुंबाचा भाग असता, त्याच कुटुंबासाठी तुमची मिळकत वापरली जाते. लग्न होऊन स्वतंत्र झालेला मुलगा अथवा मुलगी आपल्या आई-वडिलांचे घर चालवताना बऱ्याचदा दिसतात; पण तिथेही आई-वडिलांचे कुटुंब हे आपले मूळ कुटुंब आहे, हीच भावना असते. या व्याख्या व इतिहास पाहिला तर कुटुंबात स्त्री व पुरुष दोघे असतात व पुढे त्यांची वंशावळ वाढते, हा सर्वमान्य गाभा. केवळ पुरुषांचे वा केवळ स्त्रियांचे कुटुंब हा विचार कोणत्याच संस्कृतीत नाही, कारण भिन्नलिंगी व्यक्तींमुळेच नवीन मानवी जीव निर्माण होऊ शकतो, हे जैविक सत्य समाजाला सापडले आहे. कुटुंबपद्धती मातृसत्ताक असो वा पितृसत्ताक, स्त्री व पुरुष दोघांचाही समावेश त्यात दिसतो. सर्वसाधारण कोणत्याही संस्थेच्या प्रमुख उद्देश्यांपैकी एक उद्देश असतो संस्थेच्या सर्व सभासदांचे हित. कुटुंबाच्या व्युत्पत्तीत सभासदांचे हित सुरुवातीला नक्कीच अग्रभागी होते. कुटुंबातली वयोवृद्ध, अपंग माणसे, गर्भारपणामुळे/बाळंतपणामुळे काम करू न शकणाऱ्या स्त्रिया आणि वाढत्या वयाची मुले यांना संरक्षण देण्याची, त्यांचे भरणपोषण करण्याची जबाबदारी कुटुंबातल्या सक्षम सभासदांवर होती, जशी ती सर्व प्राण्यांमधल्या कळपांमध्ये दिसते. कुटुंबातली तरुण मुले-मुली सक्षम झाली की वृद्धांनी आपण होऊन रोजच्या व्यवहारातून बाजूला होऊन सल्लागाराच्या, मदतनीसांच्या भूमिकेत शिरायचे, हा सर्वसाधारण नियम होता. पण उत्क्रांतीच्या क्रमात, भरमसाठ लोकसंख्यावाढीच्या प्रपातात आणि मानवी मेंदूमधल्या तीव्र भावनांच्या कल्लोळात ही कुटुंबाची एकमेकांच्या गरजेची वीण सैल होत गेली. दुसऱ्या कोणत्याही प्राण्यामध्ये न आढळणारी एक प्रवृत्ती मानवाने विकसित केली... प्रबळाने दुर्बळाला सतत त्रास देणे. या त्रासातून कुटुंबव्यवस्थाही सुटली नाही. एकत्र कुटुंबपद्धतीची विभक्त कुटुंबपद्धतीकडे वाटचाल साधारण औद्योगिक क्रांतीनंतर व्हायला लागली. शेतीकडून माणूस कारखान्यातल्या कामाकडे वळू लागला आणि कामाच्या ठिकाणी घर घेऊन राहणे त्याच्यासाठी गरजेचे झाले. वाढलेल्या शहरांमध्ये उद्योग वाढत होते, पण जमीन कशी वाढणार? मग वृद्ध आई-वडील, काम करणारे पती-पत्नी आणि शिक्षण घेणारी मुले, अशी आटोपशीर कुटुंबे दिसायला लागली. पण या कुटुंबांच्या विवंचना, जिव्हाळ्याचे क्षण अशा खास ठेवणीतल्या भावना टिपणारी इतर माणसे दूर मूळ गावी राहिली. ङ्गशॉक अॅब्झॉर्बरफ म्हणाव्या अशा जागा कमी झाल्या. आणि त्याच वेळेस सक्षम कुटुंबसदस्यांची अरेरावी, दादागिरी वाढत गेली. माझ्या कुटुंबातले दुर्बल सदस्य माझे काहीही वाकडे करू शकत नाही, याचा इतका दंभ कुटुंबातल्या कर्त्या माणसांना होत गेला की कुटुंबांतर्गत हिंसा ही आम गोष्ट झाली. सन २०२५च्या सरकारी आकडेवारीत स्त्रियांवरच्या घरगुती हिंसाचाराची अडीच लाख प्रकरणे नोंदली गेल्याचे म्हटले आहे. आणि ही केवळ पोलिसांपर्यंत पोहोचू शकलेल्या तक्रारींची संख्या आहे. प्रत्यक्षात ही प्रकरणे कैकपट जास्त असतील. तीच गत कुटुंबातला सर्वांत परावलंबी सदस्य म्हणजे मुले यांचीही आहे. मुलांच्या वाट्याला मारहाण येते, कामाच्या ओझ्याने होणारे शारीरिक शोषण येते, भावनिक-मानसिक कुचंबणा येते आणि लैंगिक शोषणही येते. पुन्हा सरकारी अभ्यासांचा आधार घ्यायचा तर बाल लैंगिक शोषणातल्या ९६ टक्के गुन्ह्यांमध्ये कुटुंबातील अथवा शेजार-पाजारच्या, परिचयातल्या व्यक्ती सामील असतात. वृद्धांच्या परिस्थितीवर नजर टाकली तर गेल्या दहा-पंधरा वर्षांत कुटुंब न्यायालयात दाद मागायला येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या खूप वाढली आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पुण्याला देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून विकसित करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न : मुख्यमंत्री

■ पुणे/वृत्तसंस्था



पुणे शहराला देशाचे 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर' म्हणून ओळख मिळत असून ती पुढे नेण्यासाठी मेट्रोचे जाळे, रस्त्यांची सुधारणा, भूमिगत बोगद्यांचे जाळे तयार करणे आदी माध्यमातून उत्तम वाहतुकीची व्यवस्था, चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्तम जीवनशैली सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुणे शहरात हाती घेतलेले प्रकल्प पुढील ३ ते ४ वर्षात पूर्ण झाल्यानंतर देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून ओळखले जावे यासाठी प्रयत्न सुरू आहे, असेही ते म्हणाले.

मोहम्मदवाडी येथील समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याच्या साठवण टाक्यांचे लोकार्पण तसेच मुंढवा येथील महात्मा फुले चौक ते खराडी मेट्रो समवेत दुमजली उड्डाणपुलाचे ऑनलाइन भूमिपूजनासह विविध प्रकल्पांचे लोकार्पण, भूमिपूजननिमित्त रहेजा चौक, दोराबजी मॉल जवळ, मोहम्मद वाडी हडपसर येथे आयोजित जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार योगेश टिळेकर, चेतन तुपे, भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम आदी उपस्थित होते.

पुण्याचा नवीन विमानतळ, नवीन रिंग रोड, हडपसर पासून यवतपर्यंत आधुनिक प्रकारचा उन्नत मार्ग आदी सर्व माध्यमातून पुण्याची जोडणी चांगली करण्याचा प्रयत्न आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, गतवर्षी एकट्या पुण्यात देशातील २५ टक्के जीसीसी तयार झाले आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रानंतर पुढील लाट जीसीसीची असून त्यात पुणे पुढे चालले आहे. ते पुढे नेण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू आहे. पुण्याला एक आधुनिक शहर म्हणून पुढे नेण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. महात्मा फुले चौक ते खराडी हा मेट्रोसह दुमजली पूल उभारण्यात येत असून त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यासह प्रवासातील १५ ते २० वाचणार आहेत. पुण्याला गतिमान करण्याच्या प्रयत्नातील हा एक महत्वाचा पूल आहे. कोंढवा परिसरातील रखडलेल्या कात्रज कोंढवा रस्त्याचे येत्या ६ महिन्यात भूसंपादन होऊन हा रस्ता पूर्ण होईल, असेही ते म्हणाले.

देशातील पहिले पीपीपी तत्वावर दर्जेदार आरोग्य सेवा उभी करता येते हे या कर्करोग उपचार रुग्णालयाच्या उभारणीवरून दिसून येते. राज्यात मोठ्या प्रमाणात कॅन्सर ग्रीड तयार करण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न सुरू आहे. या ग्रीडच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला कॅन्सरवरील आधुनिक उपचार वेळेत आणि अत्यल्प दरात वा मोफत मिळाला पाहिजे असे प्रयत्न सुरू आहेत. त्यामध्ये हे रुग्णालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

या रुग्णालयात अतिशय आधुनिक अशा गामा स्कॅन, पेट स्कॅन आदींसह उपचार सुविधा सामान्य नागरिकांना केंद्र सरकारच्या सीजीएचएस योजनेप्रमाणे अतिशय अल्प दरात मिळणार आहेत. शासनाच्या सर्व योजना या ठिकाणी मिळणार आहेत. कॅन्सर सारखा आजार वेगाने वाढत असताना त्याचे उपचार प्रदीर्घ व खर्चिक होतात. हे पाहता पुणेकरांसाठी हे रुग्णालय एक वरदान ठरेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

ते पुढे म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज हे बुधभूषण ग्रंथ लिहित आहेत अशा स्वरूपाचे शिल्प छत्रपती संभाजी उद्यान येथे उभारले आहे. ११ भाषा ज्ञात असलेले छत्रपती संभाजी महाराज यांनी वयाच्या १४ व्या वर्षी हा संस्कृत ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे इतिहासाचा प्रत्यक्ष नमुना आहे. या ग्रंथातील १० श्लोकांचा शिल्पात समावेश केला असून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शहाजी महाराज यांचे व्यक्तिमत्व त्यातून समजण्यास मदत होते.

## पार्थ पवारांनी घेतली देवेंद्र फडणवीसांची भेट

■ मुंबई/वृत्तसंस्था

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे सुपुत्र खासदार पार्थ पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत उभयंतांत कोणती चर्चा झाली हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण त्यांच्यात राष्ट्रवादी काँग्रेसमधील बड्या नेत्यांची कथित नाराजी व पक्षाशी संबंधित इतर काही मुद्यांवर चर्चा झाल्याची माहिती आहे.

खासदार पार्थ पवार यांनी शनिवारी रात्री 10 वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या वर्षा निवासस्थानी भेट घेतली. ते यावेळी एकटेच होते. त्यांच्यासोबत राष्ट्रवादीचा कोणताही बडा नेता किंवा कोणताही सहकारी उपस्थित नव्हता. या दोन्ही नेत्यांत जवळपास 45 मिनिटे चर्चा झाली. पण त्या चर्चेचा तपशील अद्याप समोर आला नाही. त्यामुळे या दोन्ही नेत्यांनी नेमका कोणत्या मुद्यांवर संवाद साधला हे कळू शकले नाही. पण सध्या राष्ट्रवादी





काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत वादाच्या पार्श्वभूमीवर या भेटीला मोठे महत्त्व आले आहे.

### आनंद परांजपे सिल्व्हर ओकवर

शिवसेना नेते आनंद परांजपे हे शरद पवार यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी सिल्व्हर ओक बंगल्यावर गेले. आनंद परांजपे हे मूळचे शिवसैनिक आहेत. ते 14 वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. राष्ट्रवादीची दोन शकले झाल्यानंतर त्यांनी अजित पवारांची साथ दिली. पण आता पुन्हा एकदा त्यांनी शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेतला आहे. त्यांचा नुकताच शिवसेना प्रवेश झाला. त्यानंतर प्रथमच त्यांनी शरद पवारांची भेट घेतली आहे.

## युक्रेनचा रशियावर ड्रोन हल्ला; भारतीय कामगाराचा मृत्यू

■ मॉस्को/वृत्तसंस्था

रशियाच्या मॉस्कोमध्ये रविवारी रात्री युक्रेनने केलेल्या भीषण ड्रोन हल्ल्यात एका भारतीय कामगाराचा मृत्यू झाला असून अन्य तीन जण जखमी झाले आहेत. रशियातील भारतीय दूतावासाने या घटनेला दुजोरा दिला आहे. दूतावासाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देत जखमी कामगारांची विचारपूस केली.

भारतीय दूतावासाने माहिती दिली की, जखमी आणि बाधित कामगारांना सर्व आवश्यक मदत पुरवण्यासाठी आम्ही कंपनीचे व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनाच्या सतत संपर्कात आहोत. दरम्यान, मरण पावलेल्या आणि जखमी झालेल्या भारतीयांची ओळख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. तसेच या ड्रोन हल्ल्याबाबत अधिक तपशील जारी करणे प्रशासनाकडून बाकी आहे. रशियन अधिकाऱ्यांच्या मते, रविवारी रात्री झालेला हा हल्ला गेल्या काही महिन्यांतील मॉस्कोवरील युक्रेनचा सर्वात मोठा ड्रोन हल्ला होता. या हल्ल्यादरम्यान राजधानी मॉस्को आणि आसपासच्या भागात एअर रेड सायरन (हवाई हल्ल्याची पूर्वसूचना देणारे सायरन), स्फोटांचे आवाज आणि ड्रोनचे अवशेष पडल्याच्या घटना घडल्या.

### एक हजारहून अधिक युक्रेन ड्रोन हवेतच निकामी

रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने दावा केला आहे की, त्यांनी २४ तासांच्या आत देशभरात एक हजार हून अधिक युक्रेनी ड्रोनचा मारा हवेतच निकामी केला. मॉस्कोचे महापौर सेर्गेई सोब्यानिन यांनी सांगितले की, हवाई संरक्षण यंत्रणेने राजधानीच्या दिशेने येणारे किमान ८१ ड्रोन पाडले. या हल्ल्यांमुळे अनेक भागांतील निवासी इमारती आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. या संपूर्ण हल्ल्यात किमान चार जणांचा मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले, ज्यामध्ये मॉस्को प्रदेशातील तिघांचा समावेश आहे. दुसरा एक मृत्यू युक्रेनच्या सीमेला लागून असलेल्या रशियाच्या बेळगोरोड भागात झाला.

### रशियन हल्ल्यांना युक्रेनचे चोख उत्तर

रशिया-युक्रेन युद्ध मागील चार वर्षांपासून सुरु आहे. रशियाने काही दिवसांपूर्वीच कीव्हवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला केला होता. या रशियन बॉम्बफेकीनंतर युक्रेनचे अध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की यांनी सडेतोड प्रत्युत्तराचा इशारा दिला होता. हा ड्रोन हल्ला त्याच इशाऱ्याचा भाग असल्याचे सांगण्यात येत आहे. रशियाकडून युक्रेनमधील शहरे आणि नागरिकांवर सतत होणाऱ्या हल्ल्यांना हे चोख प्रत्युत्तर असल्याचे त्यांनी म्हटले होते.

## भारत-नेदरलँड्समध्ये १७ सामंजस्य करार; सेमीकंडक्टर ते हरित उर्जा...

■ हेग/वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या नेदरलँडच्या दौऱ्यावर आहेत. हेग येथे पंतप्रधान मोदी आणि नेदरलँडचे पंतप्रधान रॉब जेटेन यांच्यात महत्त्वपूर्ण चर्चा झाली. या सकारात्मक चर्चेनंतर दोन्ही देशांमध्ये १७ महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. दोन्ही देशांनी व्हिजन २०२६-२०३० चा रोडमॅप जाहीर केला असून याद्वारे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. दोन्ही देशात तंत्रज्ञान, उर्जा आणि व्यापार यांसारख्या विविध क्षेत्रांतील करार करण्यात आले आहेत.

या दौऱ्यातील सर्वात मोठा करार सेमीकंडक्टर क्षेत्रात करण्यात आला. टाटा इलेक्ट्रॉनिक आणि नेदरलँड्सच्या प्रसिद्ध कंपन्यांमध्ये धोलेरा येथे सेमीकंडक्टर फॅब्च्या उभारणीसाठी सामंजस्य करार झाला. तर शिक्षण क्षेत्रात दोन्ही देशांचा दर्जा सुधारण्यासाठी भारतातील ऐतिहासिक नालंदा विद्यापीठ आणि नेदरलँड्च्या ग्रोनिंगन विद्यापीठात शैक्षणिक देवाणघेवाणीचा करार करण्यात आला.



तसेच हरित उर्जा आणि नविनीकरणीय उर्जेच्या वापर वाढवण्यासाठी दोन्ही देशांनी संयुक्तपण संस्था स्थापन करण्याच्या निर्णय घेतला. गुजरातच्या महत्त्वकांक्षी कल्पसर प्रकल्पासाठी नेदरलँड्स भारताला तांत्रिक सहकार्य करणार आहे. याशिवाय कृषी आणि दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी दोन मोठे निर्णय घेण्यात आले. पश्चिम त्रिपुरा येथे फुलांच्या शेतीसाठी इंडो-डच सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणे आणि बंगळुरू येथे दुग्धव्यवसाय आणि पशुपालन प्रशिक्षणासाठी विशेष केंद्राची स्थापना करण्याचे निश्चित झाले. याशिवाय सायबर सुरक्षा, दहशतवादविरोधी लढाई, सीमा शुल्क सहकार्य आणि दुर्मिळ खनिजांच्या पुरवठा साखळीवर दोन्ही देश संयुक्तपण काम करण्यास सहमत झाले.

दोन्ही देशांत मोबिलिटी अँड मायग्रेशन करारही करण्यात आला. यामुळे भारतीय विद्यार्थी, व्यावसायिक आणि कुशल कामगारांसाठी नेदरलँडमध्ये राहणे, आणि काम करणे अधिक सुलभ होणार आहे.

याशिवाय या दौऱ्यात नेदरलँडने भारताला ऐतिहासिक चोल राजवटीतील मौल्यवान ताम्रपट सन्मानपूर्वक परत केले. तसेच आयसीएमआर आणि नेदरलँड्च्या राष्ट्रीय जनआरोग्य संस्थेत वैद्यकीय संशोधनासाठी महत्त्वपूर्ण करार झाला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी



# बदलापूर प्रकरणातील पीडित मुलींच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च शासन उचलणार

**मुंबई/वृत्तसंस्था**

बदलापूर येथील दुर्दैवी घटनेतील दोन्ही अल्पवयीन पीडित मुलींना सामाजिक-शैक्षणिक आधार देण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या दोन्ही मुलींच्या इयत्ता 10वी पर्यंतच्या शैक्षणिक प्रवेश शुल्काचा संपूर्ण खर्च 'एक वेळची विशेष बाब' म्हणून पूर्णपणे शासनामार्फत अदा करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या विशेष पुढाकारामुळे हा निर्णय तातडीने मार्गी लागला असून, नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच पीडित कुटुंबांना हा मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच यापुढे अशाच घटनांच्या बाबतीत शासनामार्फत कायमस्वरूपी मदतीबाबत देखील शासन निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचारार्थ आहे.महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने 14 मे 2026 रोजी या संदर्भातील अधिकृत शासन निर्णय (GR) जारी केला आहे. ऑगस्ट 2024 मध्ये बदलापूर येथील एका शाळेत घडलेल्या या अत्यंत अनुचित घटनेनंतर, पीडित मुलींच्या इयत्ता 1ली ते 10वी पर्यंतच्या शैक्षणिक प्रवेशाचा खर्च शासनस्तरावरून करण्यात येणार आहे. यानुसार दोघांचे इयत्ता 10वी पर्यंतचे संपूर्ण प्रवेश शुल्क शासन भरणार आहे. तसेच दुसऱ्या पीडित मुलीचे प्रलंबित असलेले सिनिअर के.जी. चे शुल्क आणि इयत्ता 1ली ते 10वी पर्यंतचे सर्व प्रवेश शुल्क शासनामार्फत अदा केले जाणार आहे.हा संपूर्ण खर्च 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009' (RTE) अंतर्गत थेट संबंधित शाळांना त्या-त्या शैक्षणिक वर्षामध्ये



वर्ग करण्यात येणार आहे. या निर्णयाबाबत बोलताना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, 'बदलापूरची घटना ही अत्यंत दुर्दैवी आणि संपूर्ण समाजाला वेदना देणारी होती. त्या निष्पाप मुलींना केवळ कायदेशीर न्याय मिळवून देणं एवढंच आमचं कर्तव्य नाही, तर त्यांचं भविष्य सुरक्षित करणं ही देखील आमची सामाजिक जबाबदारी आहे. त्यांच्या पालकांवर शिक्षणाचा कोणताही आर्थिक भार पडू नये, यासाठी आम्ही तातडीने हा शासन निर्णय निर्गमित केला आहे. या दोन्ही लेकींनी कोणतीही चिंता न करता आपलं शिक्षण पूर्ण करावं, शासन त्यांच्या पाठीशी एका पालकाच्या भूमिकेतून खंबीरपणे उभं आहे.'या प्रक्रियेत पीडित कुटुंबाला कोणत्याही प्रशासकीय त्रासाला सामोरे जावे लागू नये, यासाठी निधी वितरणाची पद्धत अत्यंत सुटसुटीत ठेवली गेली आहे. ठाणे जिल्हा परिषदेचे संबंधित प्राथमिक शिक्षणाधिकारी या शुल्काबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांच्याकडे सादर करतील. शिक्षण संचालकांकडून मंजुरी मिळताच हे शुल्क थेट संबंधित शाळांना अदा करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत केली जाईल. राज्य शासनाने घेतलेल्या या संवेदनशील निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, यामुळे पीडित भविष्यासाठी भक्कम पाया रचला गेला आहे.

## टवाळखोरांचा पट्रोल पंपावर कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला, थरार कॅमेऱ्यात कैद

**नागपूर/वृत्तसंस्था**

नागपूर जिल्ह्यातील केळवद परिसरात पेट्रोल पंपावर घडलेल्या एका धक्कादायक घटनेने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. किरकोळ वादातून सहा युवकांनी पेट्रोल पंप कर्मचाऱ्यावर जीवघेणा चाकू हल्ला केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र या घटनेनंतर केळवद पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे काही तासांतच सर्व आरोपी पोलिसांच्या ताब्यात आले. सावनेर-सौंसर महामार्गावरील परसोडी येथील कबीर पेट्रोल पंपावर ही घटना घडली. रवी बांगेडे हे पेट्रोल पंपावर रात्रीची ड्युटी करत होते. त्याचवेळी मोपेडवरून आलेल्या सहा युवकांनी पेट्रोल भरण्याच्या कारणावरून कर्मचाऱ्यांसोबत हुज्जत घालण्यास सुरुवात केली. सुरुवातीला शाब्दिक वाद असलेला हा प्रकार काही क्षणांतच आक्रमक बनला.वाद वाढत असतानाच एका युवकाने अचानक चाकू काढून रवी बांगेडे यांच्यावर चाकू हल्ला केला. अनपेक्षित हल्ल्यामुळे पेट्रोल पंपावरील कर्मचारी घाबरले. जखमी अवस्थेत रवी मदतीसाठी ओरडताच परिसरात एकच धावपळ उडाली. हल्ल्यानंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून मोपेडवरून पसार झाले. गंभीर जखमी झालेल्या रवी बांगेडे यांना प्रथम सावनेरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांच्या प्रकृतीची गंभीरता लक्षात घेता डॉक्टरांनी त्यांना तातडीने नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये रेफर केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांनी दिली. घटनेची माहिती मिळताच केळवद पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. ठाणेदार आशीष सिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि आरोपींच्या हालचालींच्या आधारे शोध मोहीम राबवली. दरम्यान, आरोपी नागपूरच्या दिशेने पळून जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

## पुण्यात पोलिसांच्या दिशेला गोळीबार करुन गुन्हेगार फरार, आरोपींच्या शोधासाठी पथक रवाना

**चिंचवड/वृत्तसंस्था**

एखाद्या थरारक चित्रपटालाही लाजवेल असा भयानक थरार पुण्यात पोलीस आणि गुन्हेगारांमध्ये घडला आहे. या घटनेची सध्या चांगलीच चर्चा होत आहे. पोलीस आरोपींच्या शोधासाठी गेले होते. आरोपी पोलिसांच्या अगदी जवळ होते. पण पोलीस आपल्या मागावर असल्याची शंका येताच त्यांनी धूम ठोकली. यानंतर आरोपींची गाडी पुढे आणि पोलिसांची गाडी मागे, पोलिसांकडून आरोपींना पकडण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केला जात होता. हा थरार सुरु असतानाच एका आरोपीने दुचाकीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी आरोपीच्या दिशेला गाडी नेली. या दरम्यान आरोपीचा पाठलाग करत असतानाच पोलिसांची गाडी आरोपीच्या दुचाकीला धडकली. यानंतर आरोपीने दुचाकी सोडून पळून गेला. या दरम्यान आरोपींनी पोलिसांच्या दिशेला हवेत गोळीबार करण्याचादेखील प्रयत्न केल्याची माहिती आहे.विशेष म्हणजे या घटनेत आरोपींनी पोलिसांच्या दिशेला गोळीबार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलीस आरोपींचा पाठलाग करत होते. यावेळी आरोपींनी पोलिसांच्या दिशेला हवेत गोळीबार केला. यावेळी स्वसंरक्षणासाठी पोलिसांनीदेखील हवेत गोळीबार केल्याची माहिती आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरु असतानाच आरोपी उसाच्या शेतात घुसले. पोलिसांकडून उसाच्या शेतात आरोपींचा शोध घेण्यात आला. पण आरोपी तिथून पसार झाले आहेत. आरोपींच्या शोधासाठी पुणे ग्रामीण पोलीस आणि पिंपरी चिंचवड पोलिसांचं पथक रवाना झाले आहे. आरोपींपैकी एका आरोपीचे नाव समोर आले आहे.चऱ्होली गोळीबार प्रकरणातील फरार आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांनी रांजणगाव परिसरातील पिंपरी दुमाला गावात सापळा रचला होता. मात्र पोलिसांना पाहताच आरोपींनी दुचाकीवरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तात्काळ त्यांचा पाठलाग सुरू केला. काही अंतरावर पोलिसांच्या वाहनाची धडक एका आरोपीच्या दुचाकीला बसल्यानंतर त्याने वाहन जागीच सोडून पळत सुटत हवेत गोळीबार केला.अचानक झालेल्या फायरिंगमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. आरोपीने जवळील उसाच्या शेतात धाव घेतली. पोलिसांनीही शेतात उतरून शोध मोहीम राबवली. मात्र दाट उसाचे पीक आणि अंधाराचा फायदा घेत आरोपी पसार झाला.

फरार आरोपी शेखर संभाजी जाधव याच्यावर यापूर्वीच गोळीबाराचा गुन्हा दाखल असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. घटनेनंतर पुणे ग्रामीण गुन्हे शाखा आणि पिंपरी-चिंचवड पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त परिसरात तैनात करण्यात आला आहे. नाकाबंदी करून आरोपीचा शोध सुरू असून संपूर्ण परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

## पुण्यात बॉम्बसदृश्य वस्तू ठेवण्यामागचा उद्देश काय? उलगडा होणार

**नागपूर/वृत्तसंस्था**

पुण्यातील खासगी रुग्णालय परिसरात संशयास्पद बॉम्बसदृश्य वस्तू ठेवल्याच्या खळबळजनक प्रकरणात अखेर आरोपीला नागपूर एटीएस (ATS) आणि पुणे एटीएसच्या संयुक्त कारवाईत अटक करण्यात आली. शिवाजी राठोड असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याला वर्धा जिल्ह्यातील पुलगाव रेल्वे स्थानकावरून ताब्यात घेण्यात आले. आरोपी पुणे शालीमार एक्सप्रेस (क्रमांक 18029)ने नागपूरकडे येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही धाडसी कारवाई करण्यात आली. त्याचा कडून पुणे येथील हडपसर येथील रुग्णालयात बॉम्ब ठेवल्याचा प्रकरणांमध्ये लागणारा काही रॉ मटेरियल पुरवलं असल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. त्यामुळे एटीएस



त्याचा मागावर होती आणि याच माहितीच्या आधारे त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.पुण्यातील हडपसर परिसरातील कामधेनू सोसायटी आणि उषाकिरण हॉस्पिटल परिसरात संशयास्पद वस्तू आढळल्यानंतर संपूर्ण शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. रुग्णालयाच्या पार्किंगमध्ये बेवारस अवस्थेत ठेवलेली ही वस्तू प्रथम स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आली. त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलीस, बॉम्ब शोधक आणि नाशक पथक तसेच वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. घटनास्थळी पोहोचताच पोलिसांनी संपूर्ण परिसर सील करून नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवले. संशयास्पद वस्तूची कसून तपासणी करण्यात आली. सुरक्षेच्या दृष्टीने रुग्णालय परिसरात मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या घटनेनंतर पुणे पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला.सीसीटीव्हीमध्ये आरोपीचा चेहरा स्पष्ट दिसून आल्याने तपासाला गती मिळाली. तांत्रिक माहिती आणि लोकेशन ट्रॅकिंगच्या आधारे आरोपी रेल्वेमार्गे नागपूरकडे पळून जात असल्याचे समोर आले. त्यानंतर पुणे एटीएसने नागपूर एटीएस आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या (RPF) मदतीने सापळा रचला. पुलगाव रेल्वे स्थानकावर ट्रेन थांबताच आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्याला नागपूर येथे आणण्यात आले असून, पुढील चौकशीसाठी लवकरच पुण्यात नेले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.दरम्यान, आरोपीने रुग्णालय परिसरात बॉम्बसदृश्य वस्तू ठेवण्यामागील हेतू काय होता, याबाबत आता एटीएस कडून सखोल चौकशी सुरू आहे. ही घटना केवळ खोडसाळपणा होता की यामागे मोठे षडयंत्र दडले आहे, याचा तपास सुरक्षा यंत्रणा करत आहेत. या संपूर्ण प्रकरणात एटीएस, पुणे पोलीस आणि नागपूर रेल्वे पोलिसांनी केलेल्या समन्वयपूर्ण आणि वेगवान कारवाईमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. पुणे आणि नागपूरसह राज्यातील महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी सतर्कता वाढवण्यात आली असून, संशयास्पद वस्तू आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुंबई-लखनौच्या विजयांनी बदलली समीकरणं; गुजरातला अव्वल स्थानाची संधी

**मुंबई, वृत्तसंस्था :**

IPL 2026 आता अशा निर्णायक वळणावर येऊन पोहोचली आहे, जिथे प्रत्येक सामन्यानंतर 'प्ले-ऑफ'ची समीकरणं बदलत आहेत. स्पर्धेच्या शर्यतीतून आधीच बाहेर पडलेल्या संघांनी आता निर्धास्तपणे आणि टेन्शन फ्री होऊन खेळायला सुरुवात केली आहे. सध्या 'टॉप-फोर'मध्ये स्थान मिळवण्यासाठी निकराचा लढा देणारे संघच मुंबई-लखनौसारख्या शर्यतीबाहेर पडलेल्या टीम्सच्या आक्रमक खेळाचे बळी ठरत आहेत. त्यामुळे आयपीएलबाहेर पडूनही गुणतालिका वर खाली करण्याची ताकद संघात आहे. गुरुवारी मुंबई इंडियन्सनी पंजाब किंग्सचा पराभव केला असला, तर या हंगामातील सर्वात कमकुवत संघ ठरलेल्या लखनौने शुक्रवारी चेन्नई सुपर किंग्सवर विजय मिळवला. गेल्या चार हंगामांपैकी तीन हंगामांमध्ये, केवळ अशाच संघांना 'प्ले-ऑफ'साठी पात्र ठरता



आले आहे, ज्यांनी साखळी फेरीत १६ किंवा त्याहून अधिक गुण मिळवले होते. अलिकडेच झालेल्या पराभवांमुळे, आता पंजाब आणि चेन्नई या दोन्ही संघांना १६ गुणांचा टप्पा गाठायचा असल्यास, आपापले उर्वरित दोन्ही सामने जिंकणं अनिवार्य आहे.आज गुजरात आणि कोलकाता यांच्यात सामना होणार आहे. गुजरातकडे गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावण्याची आणि प्ले-ऑफमध्ये आपले स्थान निश्चित करणारा पहिला संघ बनण्याची संधी आहे. दुसरीकडे, कोलकातासमोर विजयाशिवाय कोणताही पर्याय उरलेला नाही. सलग तीन सामने जिंकल्यानंतर चेन्नईला पराभवाचा सामना करावा लागला.

सध्या या संघाकडे १२ सामन्यांतून १२ गुण जमा आहेत, ज्यामध्ये ६ विजय आणि ६ पराभवांचा समावेश आहे. लखनौने चेन्नईचा ७ गडी राखून पराभव केला. यामुळे संघाचा 'नेट रन रेट' (+०.०२७) आणखीच खालावला, परिणामी संघ सहाव्या स्थानावर घसरला. प्लेऑफसाठी पात्र ठरण्याकरिता, चेन्नईला त्यांच्या उर्वरित दोन सामन्यांमध्ये हैदराबाद आणि गुजरात या दोन्ही संघांचा पराभव करणे अनिवार्य आहे. दुसरीकडे, लखनौचा संघ १२ सामन्यांत ४ विजय आणि ८ पराभवांसह १० व्या स्थानावर आहे. या संघाचे पुढील दोन सामने राजस्थान आणि पंजाब यांच्याविरुद्ध होणार आहेत.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स हे संघ प्रत्येकी १६ गुणांसह बरोबरीत असून, गुणतालिकेत पहिल्या दोन स्थानांवर विराजमान आहेत. जर गुजरातने आज कोलकाताचा पराभव केला, तर ते पहिल्या क्रमांकावर झेप घेतील. प्लेऑफमधील आपले स्थान निश्चित करण्यासाठी बंगळुरुला त्यांच्या उर्वरित दोन सामन्यांतून केवळ एका विजयाची आवश्यकता आहे; या संघाचे सामने पंजाब आणि हैदराबाद यांच्याविरुद्ध नियोजित आहेत.सनरायझर्स हैदराबाद १४ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. या संघाचे पुढील सामने चेन्नई आणि बंगळुरु यांच्याविरुद्ध होणार आहेत. प्ले-ऑफमधील आपले स्थान जवळपास निश्चित करण्यासाठी, त्यांना हे दोन्ही सामने जिंकणे अनिवार्य आहे.

## अर्शदीप सिंगवर पंजाब किंग्जची प्रतिक्रिया


**मुंबई/वृत्तसंस्था**

पंजाब किंग्स संघ प्लेऑफमध्ये स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करत असतानाच, त्यांचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग वादात सापडला आहे. मुंबई इंडियन्सचा खेळाडू तिलक वर्माबद्दलचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आल्यानंतर अर्शदीप सिंगवर मोठी टीका झाली, ज्यामुळे पंजाब किंग्स संघ व्यवस्थापनाला एक निवेदन जारी करावे लागले.पंजाब किंग्सचा या हंगामातील 13वा लीग सामना धर्मशाला स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळूरविरुद्ध होणार आहे. सामन्याच्या एक दिवस आधी झालेल्या पत्रकार परिषदेत, पंजाब किंग्सचे स्पोर्ट्स साइंस एंड्रयू लीपस, यांनी अर्शदीप सिंगच्या भोवती सुरू असलेल्या वादाबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, "अर्शदीपचे वर्तन पूर्णपणे सामान्य आहे आणि तो एक शांत खेळाडू आहे, तसेच सोशल मीडियाचा त्याच्यावर फारसा परिणाम होत नाही. संघातील वातावरण सकारात्मक आहे."अर्शदीप सिंगचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये तो तिलक वर्माला "ओये अंधेरे" असे म्हणताना दिसला होता. व्हिडिओ समोर आल्यानंतर तो सोशल मीडियावर वेगाने पसरला आणि अर्शदीप सिंगची टिप्पणी वंशद्वेषी मानली गेली. एंड्रयू लीपस यांनी या विषयावर पुढे भाष्य करताना म्हटले की," आजकालचे खेळाडू सोशल मीडिया आणि मोबाईल फोनवर गरजेपेक्षा जास्त वेळ घालवत आहेत, जी एक मोठी समस्या बनत आहे. टीम बसमध्ये सर्व खेळाडू आपापल्या मोबाईल फोनमध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांच्यातील संवादही लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. ही निश्चितच चिंतेची बाब आहे." आयपीएल 2026 मध्ये अर्शदीप सिंगची कामगिरीही अपेक्षेपेक्षा कमी राहिली आहे, 12 सामन्यांमध्ये त्याचा इकॉनॉमी रेट 9.69असून तो केवळ 13 बळी घेऊ शकला आहे.

## लखनौने विजयासह चेन्नईचा खेळ बिघडवला; CSK चे अंतिम चारमध्ये पोहोचणे अवघड

**लखनौ/वृत्तसंस्था**

लखनौ सुपर जायट्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात आयपीएल 2026 मधील सामना रंगला. एकाना स्टेडियमवर हा सामना रंगला. या सामन्याचे नाणेफेक हे लखनौने जिंकली आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना चेन्नईने सुरुवात खराब केली पण नंतर कार्तिक शर्माने मात्र चांगली फलंदाजी केली. यामुळे चेन्नईला 187 धावा करता आल्या. याउलट लखनौने 188 धावा केल्या आणि सामना 7 विकेट्सने जिंकला. लखनौ सुपर जायंट्सने चेन्नई सुपर किंग्सचा दणदणीत पराभव केला. लखनौ सुपर जायंट्सने सात गडी राखून विजय मिळवत या हंगामातील आपला चौथा विजय नोंदवला. मात्र, हा पराभव चेन्नई सुपर किंग्सला महागात पडला असून, ते आता प्लेऑफच्या शर्यतीत मागे पडले आहेत. या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सची गोलंदाजी पूर्णपणे अपयशी ठरली.



लखनौच्या एकाना स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, ऋषभ पंतच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, चेन्नईची सुरुवात खराब झाली. कर्णधार ऋतुराज गायकवाड आकाश सिंगच्या गोलंदाजीवर 13 धावांवर बाद झाला. संजू सॅमसनने 20 धावा केल्या, उर्विल पटेल 6 धावा करुन बाद झाला. आकाश सिंगने तीन बळी काढले.पॉवरप्लेमध्ये दोन विकेट गमावूनही, सीएसकेने जोरदार पुनरागमन केले. कार्तिक शर्मा, डेवाल्ड ब्रेविस आणि शिवम दुबे यांनी आक्रमक फलंदाजी करत सीएसकेला 20 षटकांत 5 गडी गमावून 187 धावांपर्यंत पोहोचण्यास मदत केली. कार्तिक शर्माने सर्वाधिक 71 धावा केल्या. दुबे 16 चेंडूंमध्ये 32 धावांवर नाबाद राहिला. ब्रेविसनेही 25 धावा केल्या. लखनौकडून, या हंगामात पदार्पण करणाऱ्या आकाश सिंगने सर्वाधिक तीन बळी घेतले. मोहम्मद शमी आणि शहबाज अहमद यांनी प्रत्येकी एक बळी घेतला, ज्यामुळे लखनौला सीएसकेला या धावसंख्येवर रोखता आले.

## गुजरातला जिंकण्यासाठी 248 धावांचे टार्गेट, कोलकातामध्ये फिन एलनने षटकारांचा पाऊस पाडत रचला इतिहास



**मुंबई)/वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ मधील ६० वा सामना कोलकाता नाईट रायडर्स वि. गुजरात टायटन्समध्ये सामना सुरू आहे. या सामन्यामध्ये केकेआरने गुजरातच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केल्याचं पाहायला मिळालं. प्रथमं फलंदाजी करतान केकेआर संघाने २० ओव्हरमध्ये २४७-२ धावांचा डोंगर उभारला. सलामीवीर फिन एलन याने ३५ चेंडूत ९३ धावांची आक्रमक खेळी केली. आपल्या खेळीमध्ये त्याने १० षटकारांचा पाऊस पाडला तर चार चौकार मारले. या वादळी खेळीसह त्याने एक मोठा विक्रम नावावर केला आहे. आपल्या आयपीएल पदार्पण हंगामात सर्वाधिक षटकार मारण्याच्या यादीत त्याने साल्टचा विक्रम मोडला असून ९ सामन्यात त्याने २७ षटकार मारले आहेत. या यादीमध्ये पहिल्या स्थानावर सनथ जयसूर्या असून त्याने २००८ च्या हंगामात ३१ षटकार मारले होते. त्यानंतर २०२४ मध्ये साल्ट २४ षटकार मारले होते. साल्टचा ह विक्रम आज एलनने मोडला आहे.या सामन्यात केकेआरकडून खराब सुरूवात झाली होती. अजिंक्य रहाणे हा १४ धावा करून परतला होता. त्यानंतर रघुवंशीसोबत एलनने ४१ चेंडूत ९५ धावांची भागीदारी करत गुजरातच्या गोलंदाजांनी धुलाई केली. एलन ९३ धावांवर असताना मोठा फटका खेळताना आऊट झाला. त्यानंतर आलेल्या ग्रीन याने २८ चेंडूत ५२ धावांची खेळी करत संघाला २०० धावांचा टप्पा पार करून दिला. रघुवंशी याने ४४ चेंडूत ८२ धावांची खेळी केली, यामध्ये त्याने ७ षटकार आणि ४ चौकार मारले. गुजरातच्या मोहम्मद सिराज आणि साई किशोर यांनाच एक विकेट घेता आली. सर्वांनी ९ पेक्षा जास्त इकोनॉमिने धावा खर्च केल्या. दरम्यान, गुजरात संघाने आतापर्यंत २०४ धावांच्या सर्वाधिक लक्ष्याचा पाठलाग केला आहे. त्यामुळे गुजरातसमोर आता २४८ धावांचे टार्गेट असणार असून ते यशस्वी ठरतात की नाही हे पाहणं महत्वाचं ठरणार नाही.

हा सामना जिंकल्यावर गुजरातचा संघ पहिला संघ होईल जो क्वालिफाय करणारा असेल. मात्र हरले तर त्यांच्या नेट रनरेटला फटका बसणार आहे.

# इन्फ्लुएंसर्ससाठी 1-2 मिनिटे, तर ऐश्वर्यासाठी...', कान्स रेड कार्पेट'चं वास्तव चर्चेत, तारिणी पेशावरियाचा खुलासा

सध्या जागतिक चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रतिष्ठित समजला जाणारा ' कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६' फ्रान्समध्ये मोठ्या उत्साहात सुरू आहे. गेल्या काही वर्षात अनेक सोशल मीडिया एन्फ्लुएन्सर्स देखील या कान्सच्या रेड कार्पेटवर पाहायला मिळाले. त्यामुळं या फिल्म फेस्टिव्हलबद्दल बोललं जात आहे.Cannes Film Festival चं'रेड कार्पेट' म्हणजे झगमगाट, ग्लॅमर आणि जगभरातील बड्या सेलिब्रिटींची मांदियाळी. सोशल मीडियावर कान्सचे फोटो आणि व्हिडिओ पाहून आपण थक्क होतो. मात्र, या चकाचक दुनियेचं एक वेगळे आणि धक्कादायक सत्य आता समोर आले आहे. भारतीय ब्युटी आणि फॅशन इन्फ्लुएंसर तारिणी पेशावरिया हिने सोशल मीडियावर एका व्हिडिओद्वारे कान्स रेड कार्पेटमागील 'पेड रिॲलिटी'वर उघड भाष्य केलं आहे.तारिणीनं तिच्या व्हिडिओत दिलेल्या माहितीनुसार, कान्सच्या रेड कार्पेटवर हजेरी लावणें जितके सोपे दिसतं, तितकं ते अजिबात नाही. तिथं प्रत्येक गोष्टीसाठी मोठी किंमत मोजावी लागते.तारिणीनं सांगितलं की, अनेक लोकांना असं वाटते की रेड कार्पेटवर चालताना आंतरराष्ट्रीय मीडियाचे फोटोग्राफर्स स्वतःहून तुमचे फोटो क्लिक करतात. पण सत्य पूर्णपणे वेगळं आहे.तिथं उपस्थित असलेला प्रत्येक फोटोग्राफर तुमचे फोटो काढण्यासाठी थांबलेला नसतो. अनेक फोटोग्राफर्सना तुम्ही कोण आहात हे माहितही नसतं. जर तुम्हाला तुमचे फोटो हवे असतील, तर तुम्हाला फोटोग्राफर नेमावा लागतो, त्याला पैसे द्यावे लागतात. मी स्वतः ४०० युरो (सुमारे ४४,५०० रुपये) फक्त ७ फोटो आणि ७ व्हिडिओ मिळवण्यासाठी दिले होते," असा खुलासा तारिणीनं केला आहे.सोशल मीडियावर सेलिब्रिटींचे फोटो तासनतास चर्चेत असतात, पण प्रत्यक्षात इन्फ्लुएंसर्सना रेड कार्पेटवर फार कमी वेळ मिळतो. तारिणीनं सांगितलं



की, सर्वसामान्यांसाठी किंवा इन्फ्लुएंसर्ससाठी हे रेड कार्पेट केवळ १ ते २ मिनिटांचं असतं. तिथले सुरक्षारक्षक आणि आयोजक लोकांना अजिबात वेळ देत नाहीत आणि सतत पुढं जाण्यास सांगतात.तारिणीनं व्हीआयपी संस्कृतीवर प्रकाश टाकत सांगितलं की, ऐश्वर्या राय बच्चन किंवा टॉम क्रूझ सारखे जागतिक कीर्तीचे स्टार्स जेव्हा रेड कार्पेटवर येतात, तेव्हा संपूर्ण कार्पेट त्यांच्यासाठी रिकामं केलं जातं. ऐश्वर्या राय बच्चन,टॉम क्रूझच्या एन्ट्रीवेळी कडक सुरक्षेमुळे काही मिनिटांसाठी इतरांची एन्ट्री पूर्णपणे थांबवण्यात आली होती.कान्स महोत्सवादरम्यान फ्रान्समधील हॉटेल्सचे दर गगनाला भिडतात. सेलिब्रिटींचे आवडते ठिकाण असलेल्या प्रसिद्ध 'हॉटेल मार्टिनेझ' (Hotel Martinez) बद्दल बोलताना तिनं सांगितलं की, महोत्सवाच्या काळात इथल्या एका रात्रीचं भाडं तब्बल पाच ते १० लाख रुपये इतके असतं.चांगल्या आठवणीही केल्या शेअर

या व्यावसायिक आणि महागड्या अनुभवाव्यतिरिक्त तारिणीनं काही चांगल्या आठवणीही शेअर केल्या. हॉटेलच्या लिफ्टमध्ये तिची भेट 'एमिली इन पॅरिस' च्या स्टार कास्टशी झाली होती. तसंच, प्रसिद्ध डिझायनर मनीष मल्होत्रा यांच्या टीमने तिला साडी नेसण्यासाठी मदत केली होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन यांना भेटण्याचा अनुभव अत्यंत सुखद आणि आपुलकीचा होता, असेही तिनं नमूद केलं.

# सूर्याचं जोरदार कमबॅक, त्रिशा कृष्णनसह चालली जादू, `करुप्पू`ची दोन दिवसांत तब्बल इतक्या कोटींची कमाई

सुपरस्टार सूर्या आणि अभिनेत्री त्रिशा कृष्णन स्टारर 'करुप्पू' हा ॲक्शन-ड्रामा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. आर. जे. बालाजी यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटानं प्रदर्शनाच्या दुसऱ्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर तब्बल ५१ टक्क्यांची मोठी झेप घेतली आहे. सुरुवातीला काही तांत्रिक आणि आर्थिक अडचणींमुळं पहिल्या दिवशी शो रद्द करावे लागले असले, तरी चित्रपटगृहात येताच या सिनेमानं प्रेक्षकांना वेड लावलं आहे. केवळ दोन दिवसांत या चित्रपटाने जगभरात ६६.०४ कोटी रुपयांची घसघशीत कमाई केली आहे.

सॅकनिल्क' च्या रिपोर्टनुसार, 'Karuppu'नं पहिल्या दिवशी भारतात १५.५० कोटी रुपयांची नेट कमाई केली होती. मात्र, दमदार 'वर्ड ऑफ माउथ' (प्रेक्षकांच्या सकारात्मक प्रतिक्रिया) मुळं शनिवारी (दुसऱ्या दिवशी) चित्रपटाच्या कमाईत प्रचंड वाढ झाली. शनिवारी या चित्रपटानं फक्त भारतात २३.४० कोटी रुपयांचं नेट कलेक्शन केलं. यासह चित्रपटाचं भारतातील एकूण नेट कलेक्शन ३८.९० कोटी रुपये आणि एकूण ग्रॉस कलेक्शन ४५.०४ कोटी रुपये झालं आहे.भारतासोबतच परदेशात राहणाऱ्या दाक्षिणात्य प्रेक्षकांनीही चित्रपटाला डोक्यावर घेतलं आहे. पहिल्या दिवशी परदेशातून ४ कोटींची कमाई करणाऱ्या या चित्रपटानं दुसऱ्या दिवशी १० कोटींचा गल्ला जमवला. दोन दिवसांत परदेशातील एकूण कमाई २१ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. भारत आणि परदेशातील कमाई एकत्र केल्यास चित्रपटाचे एकूण वर्ल्डवाइड कलेक्शन ६६.०४ कोटी रुपये झालं आहे.शनिवारी संध्याकाळच्या आणि रात्रीच्या शोमध्ये प्रेक्षकांची अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळाली. तामिळनाडूमध्ये अनेक



ठिकाणी रात्रीच्या शोची ऑक्यूपन्सी म्हणजेच थिएटरमधील उपस्थिती ही ८० टक्क्यांच्या पार गेली होती.'करुप्पू' चित्रपटाच्या माध्यमातून सूर्यानं पुन्हा एकदा त्याचा 'विंटेज मास' अवतार पडद्यावर जिवंत केला आहे, अशा प्रतिक्रिया त्याचे चाहते सोशल मीडियावर देत आहेत.

या चित्रपटात सूर्या आणि त्रिशासोबतच योगी बाबू , इंद्रन्स , नट्टी सुब्रमण्यम आणि स्वासिका यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. या चित्रपटाचे पार्श्वसंगीत साई अभ्यंकर यांनी दिलं असून, चित्रपटाच्या पूर्वार्धातील पार्श्वसंगीताचे आणि गाण्यांचे कौतुक सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर होत आहे.


# सिंगल फादर इमरानला धक्कादायक अनुभव

बॉलिवूड अभिनेता इमरान खान सध्या रुपेरी पडद्यापासून दूर असला, तरी तो सोशल मीडिया आणि विविध मुलाखतींमुळं सतत चर्चेत असतो. गेल्या काही वर्षापासून इमरानच्या वैयक्तिक आयुष्याची बरीच चर्चा झाली. इमरान आणि अवंतिकानं घटस्फोट घेतलाय. पण आता त्यानं घटस्फोटानंतरच्या आयुष्यावर भाष्य केलं आहे. इमराननं 'सिंगल फादर' (एकल पिता) म्हणून आपल्या मुलीचा सांभाळ करताना येणाऱ्या एका अत्यंत भावनिक आणि अडचणीचा खुलासा केला आहे. अभिनेत्री परिणीती चोप्राच्या 'मॉम टॉक्स' (Mom Talks) या टॉक शोमध्ये त्यानं हा खुलासा केला, ज्यावर परिणीतीनंही आश्चर्य आणि दुःख व्यक्त केलं आहे.इमरान खान आणि त्याची पूर्वाश्रमीची पत्नी अवंतिका मलिक यांच्यात घटस्फोट झाला असून, त्या दोघांकडे त्यांची मुलगी 'इमारा' हिची संयुक्त कस्टडी आहे. आठवड्यातून ३ ते ४ दिवस (गुरुवार ते रविवार) इमारा तिच्या बाबांकडं म्हणजेच इमरानसोबत राहते, असं त्यानं सांगितलं.इमराननं सांगितलं की, जेव्हा इमारा त्याच्या घरी असते, तेव्हा तिला तिच्या मैत्रिणींसोबत खेळायचं असतं. मात्र, जेव्हा तो इमाराच्या मैत्रिणींच्या आईला फोन किंवा मेसेज करतो, तेव्हा त्यांच्याकडून नेहमी काही ना काही कारणं सांगून नकार दिला जातो. इमारा मला विचारायची की, 'बाबा, माझ्या या मैत्रीणीला घरी खेळायला बोलवू शकतो का?' मी त्या मुलीच्या आईचा नंबर शोधून मेसेज करायचो. पण समोरून उत्तर यायचं, 'सॉरी, आज जमणार नाही.' पुढच्या आठवड्यात विचारल्यावरही तेच, 'नाही, आज ट्युशन आहे, आज टेनिस क्लास आहे.' असं सलग चार-पाच वेळा घडल्यावर मला जाणीव झाली की, एका सिंगल मॅन म्हणजेच (एकट्या पुरुषाच्या) घरात, जिथं कोणतीही महिला नाही, तिथं पालक आपल्या मुलींना पाठवायला घाबरतात किंवा त्यांच्या मनात नको ते विचार येतात, असं इमराननं सांगितलं.पालकांच्या या मानसिकतेवर इमराननं अत्यंत समजूतदारपणे पण जड अंतःकरणानं भाष्य केलं. तो म्हणाला, "मी एक पुरुष आणि पिता आहे. पण आता माझा घटस्फोट झाल्यामुळं माझ्या घरात दुसरी कोणतीही महिला नाही. आज आपण ज्या समाजात राहतो, तिथं अनेक विकृत किंवा 'प्रॉब्लेमॅटिक' पुरुष आहेत, त्यामुळं पालकांची ही भीती किंवा विचार कुठून येतो, हे मी समजू शकतो. पण एक बाप म्हणून दर आठवड्याला माझ्या मुलीला 'सॉरी बेटा, तुझी मैत्रीण आज येऊ शकत नाही' असं सांगणं माझ्यासाठी अत्यंत हृदयद्रावक (Heartbreaking) असतं.

# नवऱ्याला घटस्फोट दिल्यानंतर मौनी आणि दिशा रिलेशनशीपमध्ये ?

बॉलिवूड अभिनेत्री मौनी रॉय आणि तिचा पती सूरज नांबियार यांनी आपला ४ वर्षांचा संसार संपवून परस्पर संमतीने विभक्त होत असल्याची घोषणा केली. मौनीने सोशल मीडिया पोस्टद्वारे ही घोषणा केली आहे. त्यांनी एकमेकांना इंस्टाग्रामवर अनफॉलो केल्याचे समोर आल्यानंतर सोशल मीडियावर चर्चांना उधाण आले. दरम्यान, यात अभिनेत्री दिशा पाटनीनेही सूरज नांबियारला अनफॉलो केल्याचे नेटीझन्सच्या लक्षात आले. यामुळे मौनी आणि सूरजच्या ब्रेकअपसाठी दिशा पाटनी जबाबदार असल्याचा दावा करत सोशल मीडियावर तिला मोठ्या प्रमाणावर ट्रोल केले जाऊ लागले. या संपूर्ण वादावर






मौनी रॉयने सोशल मीडियाद्वारे लोकांना आवाहन केले आहे की, तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल कोणत्याही खोट्या बातम्या किंवा अफवा पसरवू नयेत आणि तिच्या कुटुंबाला या कठीण काळात प्रायव्हसी (खाजगी स्पेस) द्यावी.दरम्यान, या घटस्फोटाच्या वृत्तानंतर सोशल मीडियावर मौनी रॉय आणि तिची जवळची मैत्रीण अभिनेत्री दिशा पाटनी यांचा एक फोटो प्रचंड व्हायरल होत आहे, ज्यामध्ये दोघींच्या गळ्यात हार दिसतात. या फोटोसोबत एक कथित पोस्ट जोडण्यात आली आहे, ज्यात लिहिले आहे की, "एक अध्याय संपला. मला तिच्यामध्ये माझे आयुष्य सापडले आहे. होय, दिशा आणि मी या प्रेमाच्या नात्याला लग्नात बदलण्यासाठी तयार आहोत. जखमा भरून काढण्यापासून ते कायमच्या आनंदापर्यंतचा हा प्रवास सुरू होतोय." या व्हायरल पोस्टमुळे दोघींमध्ये प्रेमसंबंध असून त्या लग्न करणार असल्याच्या अफवा वेगाने पसरू लागल्या. परंतु, या व्हायरल पोस्टमागे कोणतेही सत्य नसून ती पूर्णपणे खोटी आणि एडिट केलेली आहे. मौनी रॉय आणि दिशा पाटनी यांच्या लग्नाची किंवा नात्याची घोषणा करणारी ही पोस्ट अधिकृत नाही. व्हायरल झालेला फोटो जून २०२५ मधील असून दिशा पाटनीच्या वाढदिवसानिमित्त या दोघी मैत्रिणी इस्कॉन मंदिराला भेट देण्यासाठी गेल्या होत्या, तेव्हाचा हा फोटो आहे. या फोटोवरील कॅप्शन आणि मजकूर पूर्णपणे एडिट करून खोटा तयार करण्यात आला आहे. दोन्ही अभिनेत्रींकडून त्यांच्यात प्रेमसंबंध असल्याचा किंवा लग्नाचा कोणताही अधिकृत खुलासा किंवा निवेदन जारी करण्यात आलेले नाही.

# आळंदीत आद्य संत भोजलिंग काका महाराजांच्या भव्य स्मारकासाठी हालचाली गतिमान!

## माजी आमदार डॉ.संजयजी रायमुलकर यांच्या पुढाकाराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा; विश्वकर्मा समाजबांधवांकडून आभार....

जनसंचलन/बुलढाणा

भारतातील नवे आध्यात्मिक ज्ञानपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पावन भूमी आळंदी येथे विश्वकर्मा समाजाचे आद्य संत भोजलिंग काका महाराज यांचे भव्य-दिव्य स्मारक उभारण्याच्या हालचालींना आता वेग आला आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघाचे माजी कार्यसम्राट आमदार संजय रायमुलकर यांच्या विशेष पुढाकारामुळे या मागणीला मोठे बळ मिळाले असून, संपूर्ण विश्वकर्मा समाजात आनंदाचे वातावरण आहे. इचलकरंजी येथून झाली होती मागणीची सुरुवात आळंदी येथे संत भोजलिंग काका महाराजांचे स्मारक व्हावे, ही पहिली आग्रही मागणी कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी येथून श्री विश्वकर्मा आद्य संत भोजलिंग काका महाराज स्मृती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्री. दत्तात्रय सुभाष सुतार व त्यांच्या संपूर्ण टीमने सुरू केली होती. या मागणीला नाशिक, जामनेर, भडगाव आणि पाचोरा येथील समाजबांधव तसेच भोजलिंग काकांचे परमभक्त आणि सुतार जनजागृती सेवा संस्थाचे अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब वाघ व त्यांच्या टीमने भक्कम पाठिंबा देत सातत्याने पाठपुरावा केला. माजी आमदार डॉ.संजय रायमुलकर यांचा तत्पर पुढाकार विधानसभेत आद्य संत भोजलिंग काका महाराज





आर्थिक विकास महामंडळ मंजूर करून आणणारे आमदार संजय रायमुलकर साहेब यांच्याकडे बाळासाहेब वाघ व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्मारका संदर्भातील मागणीचे निवेदन सादर केले. माजी



आमदार रायमुलकर यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून तातडीने दखल घेतली आणि राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याशी दूरध्वनीवरून या स्मारकाबाबत सविस्तर व सकारात्मक चर्चा केली.

माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांनी तातडीने पावले उचलल्याबद्दल आणि ही मागणी सरकारपर्यंत पोहोचवल्याबद्दल नाशिकचे बाळासाहेब वाघ व त्यांच्या संपूर्ण टीमचे श्री विश्वकर्मा आद्य संत भोजलिंग काका महाराज स्मृती प्रतिष्ठान आणि विश्वकर्मा समाजाच्या वतीने मनापासून आभार मानण्यात आले आहेत. या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा राहिला मोठा सहभाग हे स्मारक लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी समाजातील अनेक प्रमुख पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते अहोरात्र प्रयत्न करत आहेत. यामध्ये: बाळासाहेब वाघ (अध्यक्ष, सुतार जनजागृती सेवा संस्था)दत्तात्रय सुभाष सुतार (संस्थापक अध्यक्ष, श्री विश्वकर्मा आद्य संत भोजलिंग काका महाराज स्मृती प्रतिष्ठान, इचलकरंजी) सुनील भाऊ देवरे (प्रदेश उपाध्यक्ष)इश्वर जाळकर,गोपाल जाधव,किरण सोनवणे,समाधान मेतकर संत भोजलिंग काकांचे स्मारक हाच आमचा ध्यास असून, समाजाची साथ आणि माजी आमदार डॉ.संजयजी रायमुलकर साहेब यांच्या प्रयत्नांमुळे हे स्वप्न नक्कीच साकार होईल, असा विश्वास समाजबांधवांनी व्यक्त केला आहे.

---

# चिखलीत वाहनविना सप्ताहवरून राजकीय रणकंदन; भाजप-शिवसेना समर्थन, काँग्रेसचा तीव्र पलटवार!

जनसंचलन/ चिखली

आज राजकीय वातावरण चांगलेच तापले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशपातळीवर इंधन बचतीसंदर्भात केलेल्या आवाहनानंतर वाहनविना दिवस/सप्ताह या उपक्रमावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर चिखली नगरपरिषदेतील सत्ताधारी गटाकडून अनोखा निर्णय घेण्यात आला. नगराध्यक्ष पंडितराव देशमुख यांनी घोषणा करत मोदीजींच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून चिखली नगरपरिषदेत तीन दिवस वाहनविना प्रवास केला जाणार आहे. तसेच नगरपरिषदेतील सर्व पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनीही हा उपक्रम पाळावा, असे आवाहन केले. या निर्णयाला भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा असल्याचेही सांगण्यात आले. मात्र या निर्णयावर तीव्र पलटवार




करत काँग्रेस नेते गोपाल देवडे यांनी सरकारवर सडकून टीका केली. त्यांनी आरोप केला की देश आर्थिक संकटात असताना पेट्रोल-डिझेलची टंचाई जाणवत आहे. लोकांना पंपावर इंधन मिळत नाही, पण केवळ एका दिवसाचा दिखावा करून जनतेची दिशाभूल केली जात आहे. तसेच त्यांनी खासदार, आमदार, मंत्री यांच्या पगार-भत्त्यांवरही प्रश्न उपस्थित करत खरी काटकसर करायची असेल तर ती दिल्लीपासून सुरू झाली पाहिजे, असा हल्लाबोल केला. या घडामोडींमुळे चिखली शहरात राजकीय वातावरण ढवळून निघाले असून सत्ताधारी व विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची तीव्रता वाढली आहे. जनतेमध्ये मात्र या उपक्रमाबाबत संमिश्र प्रतिक्रिया उमटत असून काहीजण याला प्रेरणादायी पाऊल म्हणत आहेत, तर काहीजण याला केवळ राजकीय स्टंटबाजी असल्याचे सांगत आहेत.

# वन स्टॉप सेंटरला हिरवा कंदील !

जनसंचलन/बुलढाणा

घरगुती हिंसा, लैंगिक अत्याचार, कौटुंबिक छळ, तसेच विविध संकटांना सामोऱ्या जाणाऱ्या महिलांसाठी बुलढाणा जिल्ह्यात मोठा दिलासा देणारा निर्णय शासनाने घेतला आहे. केंद्र पुरस्कृत मिशन शक्ती योजनेंतर्गत संबल उपयोजनेच्या माध्यमातून बुलढाण्यात वन स्टॉप सेंटर सुरू करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असताना पीडित महिलांना मदतीसाठी विविध कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत होते. मात्र, आता या केंद्राच्या माध्यमातून वैद्यकीय उपचार, कायदेशीर सल्ला, पोलिस सहाय्य, तात्पुरता निवारा, मानसोपचार आणि समुपदेशन अशा सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महिला व बाल विकास विभागाने जिल्ह्यातील गरज, वाढती लोकसंख्या आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. शासनाच्या निर्णयानुसार केंद्र प्रत्यक्ष कार्यान्वित झालेल्या तारखेपासून सुरू मानले जाणार आहे.



# बुलढाणा कलेक्टर ऑफिसमध्ये बदलीचा खेळ....!

## नियमांना केराची टोपली? १०-१५ वर्षे एकाच खुर्चीत कर्मचारी; बदली की सेटिंग....

**बुलढाणा**

जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी बदली प्रक्रियेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून नियमांची पायमल्ली होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. उमाळी (ता. मलकापूर) येथील सामाजिक कार्यकर्ते सुकराम इंगळे यांनी थेट राज्याच्या महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांकडे तक्रार दाखल करत प्रशासनाला धक्का दिला आहे. इंगळे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, बदली अधिनियम २००५ तसेच शासनाच्या विविध निर्णयांचे उल्लंघन करून बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयात कर्मचाऱ्यांना वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी ठेवले जात आहे. काही कर्मचारी १० ते १५ वर्षांपासून मुख्यालयातच कार्यरत असून, त्याच ठिकाणी त्यांची बदली व पदोन्नतीही करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.




विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी कार्यालयातून विविध आस्थापनांमध्ये केवळ अंतर्गत बदल्या करून कर्मचाऱ्यांना प्रत्यक्षात त्याच कार्यालयात ठेवले जात असल्याचेही निवेदनात नमूद आहे. त्यामुळे बदलीच्या नियमांचा उद्देशच फोल ठरत असल्याची टीका करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर, काही प्रकरणांमध्ये कर्मचारी दुसरीकडे बदली दाखवून प्रत्यक्षात मूळ ठिकाणीच काम करत असल्याने शासनाचा आर्थिक तोटा होत असल्याचाही आरोप आहे. सन २०२१ ते २०२५ या कालावधीत झालेल्या सर्व बदल्यांची सखोल चौकशी करण्याची मागणी इंगळे यांनी केली आहे. तसेच ६ वर्षांपेक्षा जास्त कालावधी एकाच मुख्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या तात्काळ बदल्या करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणामुळे जिल्हा प्रशासनात खळबळ उडाली असून आता शासन कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कोट्यवधींची पाईपलाईन पण पाणी थेट नाल्यात! देऊळगाव राजा तहानलेच



**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

शहरात पाणीटंचाईने नागरिक त्रस्त असताना प्रशासनाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा उघड झाला आहे. एकीकडे नागरिकांना १५-१५ दिवसांनीही पाणी मिळत नाही, तर दुसरीकडे फुटलेल्या पाईपलाईनमधून हजारो लिटर पाणी सर्रास नाल्यात वाहताना दिसत आहे. कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली पाईपलाईन प्रत्यक्षात ङ्गनासाडी प्रकल्पफ ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. निवडणुकीपूर्वी ङ्गदर ३-४ दिवसांनी पाणीफ, ङ्गशहराचा पाणीप्रश्न कायमचा संपवूफ अशा घोषणा देत सत्तेत आलेले नगराध्यक्ष, उपाध्यक्ष आणि नगरसेवक आता मात्र पूर्णपणे गायब असल्याचा आरोप होत आहे. नागरिकांच्या डोळ्यांसमोर पाणी वाया जात असताना संबंधित अधिकारी आणि पदाधिकारी यांना याचे काहीच सोयरसुतक नसल्याचे चित्र आहे. शहरात नवीन पाईपलाईनचे काम मोठ्या गाजावाजात करण्यात आले. मात्र अनेक ठिकाणी रस्ते उखडून ठेवलेले आहेत, गळती थांबलेली नाही आणि पाणीपुरवठा सुरळीत झालेला नाही. परिणामी नागरिकांना दुहेरी फटका बसत आहे.एकीकडे रस्त्यांची दुर्दशा, तर दुसरीकडे पाण्यासाठी वणवण. दुरुस्तीसाठी निधी नाहीफ असे कारण देत प्रशासन वेळकाढूपणा करत असल्याने संताप अधिकच वाढला आहे. गेल्या २० वर्षांपासून पाणीटंचाईचा प्रश्न कायम असताना प्रत्येक निवडणुकीत त्याच मुद्द्यावर राजकारण केले जाते, पण प्रत्यक्षात उपाययोजना मात्र शून्यच राहतात.

## शनि अमावस्येला सैलानी दर्गा मार्गावर पोलिसांचा एक्शन मोड; नियमभंग करणाऱ्यांवर थेट कारवाई!

**जनसंचलन/ रायपूर**

शनि अमावस्या निमित्त सैलानी दर्गा येथे हजारो भाविकांची उसळलेली गर्दी आणि त्यातून निर्माण झालेली प्रचंड वाहतूक कोंडी या पार्श्वभूमीवर रायपूर पोलिसांनी अक्षरशः ङ्गएक्शन मोडफ घेतला. रायपूर ते सैलानी महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ झाल्याने कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबवण्यात आली. कडक उन्हात तासन्तास उभे राहून पोलीस हवालदार अख्तर शेख व देविदास दळवी यांनी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी जीवाचे रान केले. मात्र नियम तोडणाऱ्यांना पोलिसांनी अजिबात सवलत दिली नाही. हेल्मेट नसणे, ट्रिपल सीट, मोबाईलवर बोलत वाहन चालवणे, कागदपत्रे अपूर्ण अशा बेफिकीर चालकांवर तात्काळ कारवाई करत १३,९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पोलिसांनी केवळ दंडच नाही तर वाहनचालकांना नियमांचे महत्त्वही पटवून दिले. वेगावर नियंत्रण ठेवा, हेल्मेट-सीट बेल्ट वापरा, नियम पाळा, असा स्पष्ट इशारा देण्यात आला. सण-उत्सवांच्या काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी अशा कठोर मोहिमा यापुढेही सुरूच राहणार, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.






दैनिक निडर निर्भिड जनसंचलन — व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन — व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८